आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२९ नोव्हेंबर २०२४ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ओदिशा, हरियाणा आणि  महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपचा विजय हा सरकारच्या धोरणांवर आणि योजनांवर जनतेच्या विश्वासाचं निदर्शक असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- गेल्या ऑक्टोबर महिन्यात देशातल्या प्रमुख उद्योगांच्या उत्पादनात ३ पूर्णांक १ दशांश टक्क्यांनी वाढ
- अदानी लाचखोरी प्रकरणासह इतर मुद्यांवर विरोधी पक्षांचा आजही संसदेत गदारोळ/ दोन्ही सभागृहांचं कामकाज येत्या सोमवारपर्यंत तहकूब
- सैद मोदी आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन स्पर्धेत पी. व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन उपान्त्य फेरीत दाखल

**आणि**

- महाराष्ट्रात गोंदिया जिल्ह्यात बस अपघातात ११ जण ठार/ मृतांच्या कुटुंबांना एसटी महामंडळाकडून १० लाख तर केंद्रसरकारकडून २ लाख अर्थसहाय्य

**<><><><><>**

ओदिशा पाठोपाठ, हरियाणा, आणि महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांमध्ये भाजपाचा दणदणीत विजय हा लोकांचा सरकारच्या धोरणांवर आणि योजनांवरचा विश्वास दर्शवतो असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री तीन दिवसांच्या ओदिशा दौऱ्यावर असून आज भुवनेश्वरमध्ये बिजू पटनायक आंतरराष्ट्रीय विमानतळाजवळ  त्यांची एक सभा झाली. केंद्रातलं भाजपा सरकार ओदिशाला प्राधान्य देत असून ओदिशामध्ये भाजपाचे सरकार स्थापन झाल्यावर लगेच महिलांसाठी सुभद्रा योजनेसारखी अनेक मोठी पावलं उचलण्यात आल्याचं

त्यांनी सांगितलं. विरोधकांचा संविधानावर विश्वास नसल्याचं सांगत विरोधक विकासाची गती रोखत असल्याची टीका त्यांनी केली. प्रधानमंत्र्यांनी यावेळी विमानतळ ते राजभवन असा रोड शोही केला. पोलिस महासंचालक आणि महानिरीक्षकांच्या परिषदेला उपस्थित राहण्यासाठी प्रधानमंत्री मोदी शनिवार आणि रविवारी भुवनेश्वरमध्ये असतील. भुवनेश्वर मधल्या भाजप मुख्यालयात होणाऱ्या पक्षाच्या बैठकीलाही ते उपस्थित राहणार आहेत.

**<><><><><>**

गेल्या ऑक्टोबर महिन्यात देशातल्या प्रमुख उद्योगांच्या उत्पादनात ३ पूर्णांक १ दशांश टक्क्यांनी वाढ झाल्याची माहिती, वाणिज्य मंत्रालयाने दिली आहे. एप्रिल ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत प्रमुख ८ उद्योगांमधे उत्पादन ४ पूर्णांक १ दशांश टक्क्यांनी वाढलं. त्यात कोळसा, तेलशुद्धिकरण, पोलाद, सिमेंट, वीज आणि खतं यांचा प्रामुख्याने समावेश आहे. कोळसा उद्योगात ७ पूर्णांक ८ दशांश, तेलशुद्धिकरण ५ पूर्णांक २ दशांश, स्टील मधे ४ पूर्णांक २ दशांश, सिमेंट ३ पूर्णांक ३ दशांश तर वीज निर्मिती उद्योगाच्या उत्पादनात ६ दशांश टक्क्यांनी वाढ झाली आहे.

देशाच्या परकीय चलन साठ्यात सलग आठव्या आठवड्यात घट झाली असून हा साठा १ अब्ज ३१ कोटी डॉलरनं घसरून ६५६ अब्ज ५८ कोटी डॉलर झाल्याची माहिती रिझर्व्ह बँकेनं आज जारी केलेल्या आकडेवारीत दिली आहे.

**<><><><><>**

अदानी लाचखोरी प्रकरणासह इतर मुद्यांबाबत विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळं संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या कामकाजात आजही अडथळे

निर्माण झाले. त्यामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहांचं कामकाज आज चौथ्या दिवशी देखील दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

देशभरात न्यायव्यवस्थेत ५ हजार ६०० हून अधिक न्यायाधिशांची पदं रिक्त असल्याची माहिती सरकारनं आज लोकसभेत दिली. सर्वोच्च न्यायालयात २, उच्च न्यायालयात ३६४, तसंच जिल्हा आणि खालच्या न्यायालयात ५ हजारांहून अधिक पदं रिक्त आहेत. गेल्या पाच वर्षांत देशभरातल्या विविध उच्च न्यायालयांमध्ये सुमारे ५०० न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात आल्याचं कायदेमंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी लेखी उत्तरात सांगितलं.

देशात दर ८११ लोकसंख्ये साठी १ डॉक्टर असल्याचं सरकारनं म्हटलं आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी लोकसभेत एका लेखी उत्तरात ही माहिती दिली.

प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी योजनेअंतर्गत २०२७ पर्यंत देशभरात २५ हजार जन औषधी केंद्रं सुरु करण्याचं उद्दिष्ट ठेवल्याचं अनुप्रिया पटेल यांनी दुसऱ्या एका उत्तरात सांगितलं. यावर्षी मार्च अखेरपर्यंत एकूण १४ हजार १३१ जन औषधी केंद्र उघडण्यात आली आहेत. तसंच गेल्या पाच वर्षांत एकूण सहा पुरवठादारांवर गुणवत्ता मानकांचं पालन न केल्याबद्दल बंदी घालण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

पुण्याजवळ खडकवासला इथल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीचा १४७ व्या तुकडीचा दीक्षान्त समारंभ आज झाला. लखनौ विद्यापीठाचे कुलगुरु आलोक कुमार

राय प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यंदा ३५९ स्नातकाना पदवी प्रदान करण्यात आली. यामध्ये विज्ञान शाखेचे ८३, संगणक विज्ञान ८६, कला शाखेचे ५८ तर बी टेक शाखेच्या १३२ छात्रांचा समावेश असून १९ परदेशी छात्र आहेत. उद्या सकाळी १४७ व्या तुकडीचं दीक्षांत संचलन होणार असून, हवाई दल प्रमुख एअर चीफ मार्शल अमरप्रीत सिंग मानवंदना स्वीकारतील.

<><><><>

नाशिक रोड इथल्या कॅट अर्थात कॉम्बॅट आर्मी एव्हिएशन ट्रेनिंग स्कूलमधले विविध अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा दीक्षान्त समारंभ आज सकाळी झाला. या प्रसंगी शानदार संचलन करत वैमानिकांच्या तुकडीनं वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांना मानवंदना दिली. चित्ता, चेतक, ध्रुव या लष्करी हेलिकॉप्टरची चित्तथरारक प्रात्यक्षिकं यावेळी झाली.

कॅटच्या या दीक्षांत समारंभादरम्यान नेपाळ, नायजेरिया तसंच भारतीय लष्करी अधिकाऱ्यांसह ४ महिला अधिकाऱ्यांनीही हेलिकॉप्टर पायलटची पदवी प्राप्त केली.

<><><><>

भारतीय बॅडमिंटनपटू पी.व्ही. सिंधू आणि लक्ष्य सेन हे दोघे सैद मोदी आंतरराष्ट्रीय सुपर ३०० बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. सिंधूने चीनच्या दाई वांगचा २१-१५, २१-१७ असा पराभव केला. पुरुष एकेरीत लक्ष्य सेनने भारताच्याच मिराबा लुवांग मासनमचा २१-८, २१-१९ असा पराभव केला. उपांत्य फेरीत सिंधूचा सामना उन्नती हुडाशी होईल, तर लक्ष्यचा सामना जपानच्या शोगो ओगावाशी होईल. महिला दुहेरीत ट्रेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद, या जोडीने गो पेई की आणि तेओह मेई जिंग यांचा २१-८, २१-१५ असा

पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. तर मिश्र दुहेरीत ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो या पाचव्या मानांकित जोडीने मलेशियाच्या लू बिंग कुन आणि हो लो ई यांचा २१-१६, २१-१३ असा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

गोंदिया जिल्ह्यात आज सकाळी एस टीच्या शिवशाही बसला अपघात होऊन ११ जणांचा मृत्यू झाला तर ३३ जण जखमी झाले. ही बस भंडाऱ्याहून गोंदियाकडे चालली होती. वाटेत सडक अर्जुनी मार्गावर बिंद्रावन टोला या गावानजीक चालकाचं नियंत्रण सुटल्याने बस उलटून हा अपघात झाला. जखमींना गोंदिया जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेविषयी तीव्र शोक व्यक्त केला असून प्रधानमंत्री आपत्कालीन सहाय्य निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी २ लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांच्या मदत जाहीर केली आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला असून मृतांच्या कुटुंबांना एसटी महामंडळातर्फे प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा केली आहे. तसंच, आवश्यकता वाटल्यास जखमींना खासगी रुग्णालयात दाखल करावं आणि त्यांच्यावर शासकीय खर्चातून उपचार करावेत, असे आदेश मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील या अपघाताविषयी तीव्र शोक व्यक्त केला आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशात संभल इथल्या शाही जामा मशीदप्रकरणी मशीद समितीनं अलाहाबाद उच्च न्यायालयात दाखल केलेली याचिका सुनावणीला येईपर्यंत, खालच्या न्यायालयातली सुनावणी स्थगित करावी असे निर्देश सर्वोच्च

न्यायालयानं दिले आहेत. संभल जिल्ह्यात चंदौसी इथली शाही जामा मशीद , हरिहर मंदिराच्या जागेवर उभारण्यात आली आहे असा दावा जिल्हा न्यायालयात दाखल झाल्यानंतर मशिदीच्या सर्वेक्षणाचे आदेश न्यायालयानं १९ नोव्हेंबरला दिले होते. त्याला मशिद समितीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्यावर सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांनी सांगितलं की मशीद समितीने या बाबतीत अलाहाबाद उच्च न्यायलयात दाद मागावी. दरम्यान सर्वेक्षणाचा अहवाल बंद लिफाफ्यात जिल्हा न्यायालयात सादर केला जावा. उच्च न्यायालयात मशीद समितीची याचिका दाखल होईपर्यंत याप्रकरणी पुढे काहीही करु नये असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा न्यायालयाला दिले.

**<><><><><>**

आकाशवाणी ही संस्था तिच्या स्थापनेपासूनच देशाचा आवाज बनली आहे. बातम्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्याबरोबरच आकाशवाणीने कोट्यवधी श्रोत्यांसाठी मनोरंजक आणि दर्जेदार कार्यक्रम सादर केले आहेत, असे गौरवोद्गार राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश यांनी काढले. आकाशवाणी नवी दिल्ली इथं आयोजित डॉ. राजेंद्र प्रसाद स्मृती व्याख्यानमाले ते बोलत होते. आकाशवाणीच्या महासंचालक प्रज्ञा पालिवाल यावेळी उपस्थित होत्या.

**<><><><><>**

काश्मीर हे भारताचं अविभाज्य अंग असून आपण एकत्रित राहिल्यास जगातली कोणतीही शक्ती आपल्याला आव्हान देऊ शकणार नाही असं प्रतिपादन महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी केलं. ते आज राजभवनात केंद्रीय गृह मंत्रालयाच्या 'मेरा युवा भारत : वतन को जानो' कार्यक्रमांतर्गत काश्मीरमधून मुंबई भेटीवर आलेल्या युवकांसोबत संवाद साधत होते.

**<><><><><>**

गदिमा प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ अभिनेत्री आशा काळे यांना यंदाचा गदिमा पुरस्कार, तर दिवंगत अभिनेते लक्ष्मीकांत बेर्डे यांच्या पत्नी आणि ज्येष्ठ अभिनेत्री प्रिया लक्ष्मीकांत बेर्डे यांना गदिमांच्या पत्नी विद्या माडगूळकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा गृहिणी सखी सचिव पुरस्कार देण्यात येणार आहे. प्रसिद्ध कथा, पटकथा, संवाद लेखक आणि गीतकार क्षितीज पटवर्धन यांना यंदाचा चैत्रबन पुरस्कार, तर प्रसिद्ध गायिका मनीषा निश्चल यांना विद्या प्रज्ञा पुरस्कार देण्यात येणार आहे.

ग. दि. माडगूळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त येत्या १४ डिसेंबरला पुण्यात टिळक स्मारक मंदिर इथं या पुरस्कारांचं वितरण होणार आहे.